मा.उच्च न्यायालयातील रिट याचिका क्र.६००८/२००५ व ७०३२/२००५ मध्ये दि.१९/०९/२००५ व २०/१०/२००५ रोजी दिलेल्या न्यायालयीन निर्णयानुसार दुग्धव्यवसाय विकास विभागामध्ये १७ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास मंजूरी देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्र.दुविआ-२०११/प्र.क्र.१०८/पदुम-९
मंत्रालय,विस्तार भवन,मुंबई-४०००३२
दिनांक - २६/०४/२०१८.

वाचा :- १. आयुक्त,दुग्धव्यवसाय विकास कार्यालयाचे पत्र क्र.आदुवि-१९(ड)/रिया/६००८/२००५/ प्र.क्र.८०६/१५०४,दि.२०/०३/२०१७.

२. प्रादुविअ/मुंबई/अ-१/१५०५/९६(सी)सीसी२११३५/२०१२/सर्वोच्च न्याया/भाग-६००१/२०१६, दि.२१/१२/२०१६.

३. मा.उच्चस्तरीय सचिव समितीच्यां दि.१३/३/२०१८ रोजी झालेल्या सन २०१८ मधील तिसऱ्या बैठकीचे कार्यवृत दि. ३/४/२०१८.

प्रस्तावना :-

प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी,नवी मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या शासकीय दूध योजना, गोवे-भिवंडी, महाड व खोपोली येथील १७ रोजंदारी कर्मचाऱ्यांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे दाखल याचिकेमध्ये दिलेला निर्णय कर्मचाऱ्यांना मान्य नसल्याने मा.उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.६००८/२००५ व ७०३२/२००५ मध्ये मा.न्यायालयाने दि.१९/०९/२००५ व दि.२०/१०/२००५ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.६००८/२००५ मधील एसएलपी क्र.सीसी२११३५/२०१२ अन्वये अपिल दाखल करण्यात आले होते. उच्च न्यायालयाच्या आदेशाविरुध्द अपिल दाखल करण्यासाठी ५ वर्षे इतका विलंब झाल्याने तसेच मा.उच्च न्यायालयाने दिलेला निर्णय बरोबर असल्याने मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.१०/०१/२०१४ रोजी सदर अपिल खारिज केले. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाने दि.१९/०९/२००५ व दि.२०/१०/२००५ रोजी दिलेल्या निर्णयानुसार रोजंदारी वरील २४० दिवस पूर्ण केल्यानंतर त्यांना आस्थापनेवर सामावून घेऊन त्यांना वेतनावरील फरकाची रु.१९,८२,६६६/- इतकी रक्कम अदा करण्यास तसेच शासकीय सेवेत सामावून घेणेबाबत कर्मचाऱ्यांसाठी १७ अधिसंख्य पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि. ३/४/२०१८रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृता नुसार दुग्धव्यवसाय विकास विभागामध्ये १७ अधिसंख्य पदे निर्माण करण्याची मंजूरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार पुढील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय –

मा. उच्च न्यायालयाने दि.१९.०९.२००५ व दि.२०.१०.२००५ रोजी दिलेल्या निर्णयानुसार १७ रोजंदारी कामगारांना त्यांचे रोजंदारीवरील २४० दिवस पूर्ण झाल्याच्या दिनांकापासून मजदूर पदाचे आर्थिक लाभ देण्यासाठी दुग्धव्यवसाय विकास विभागामध्ये मा.उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.३/४/२०१८ रोजीच्या कार्यवृत्तान्वये प्राप्त मान्यतेनुसार १७ अधिसंख्य पदे निर्माण करण्यास शासनाची मंजूरी देण्यात येत आहे.

१. उपरोक्त या कर्मचा-यांना २४० दिवसांहून अधिक दिवस नियमित कामावर ठेवण्यास मंजूरी दिलेल्या अधिका-यांवर जवाबदारी निश्चित करुन पूढील कारवाई करण्याच्या अधिन राहून १७ मजूर अधिसंख्य पदे निर्मितीस मान्यता देण्यात येत आहे.
२. भविष्यात सेवानिवृती, मृत्यू, वा अन्य कारणामुळे नियमित पदे रिक्त होतील त्याप्रमाणे अधिसंख्य पदावरील कर्मचा-यांचे नियमित पदावर समावेशन करण्यात येवून अधिसंख्य पदे निरसित करण्याची कार्यवाही करण्यात यावी.
३. सदर पदे ही त्या पदावरील कर्मचारी त्याच पदावर कार्यरत असेपर्यंत अस्तित्वात राहतील. सेवानिवृत्ती, राजीनामा, मृत्यू किंवा नियमित पदावर समावेशन इ. कारणामुळे सदर पदे रिक्त झाल्यानंतर आपोआप निरसित होतील.
४. सदर अधिसंख्य पदे मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाचे अनुपालन करण्यासाठी निर्माण केलेली असल्यामुळे या पदांवर विचाराधीन १७ कर्मचाऱ्यांशिवाय अन्य कोणत्याही कर्मचाऱ्यांची नियुक्ती होणार नाही, याची आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास यांनी दक्षता घ्यावी.
५. विभागाच्या मंजूर आकृतीबंधानुसार अस्तित्वात असलेल्या संवर्गामध्ये नवीन पदनिर्मीती केल्यास त्या पदांना मंजूर आकृती बंधाप्रमाणे त्या-त्या संवर्गाची वेतनश्रेणी लागू राहील.

सदर शासन निर्णय दि. ३/४/२०१८ रोजीच्या मा. उच्चस्तरीय सचिव समितीच्या बैठकीच्या कार्यवृत्तान्वये प्राप्त मान्यतेस अनुसारुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४२६१६४८११५७०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Naikwade Ashok Shivaji

Digitally signed by Naikwade Ashok Shivaji
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ee35d3eddb6baa653600ca8a102ebe878e80bcc3e4aa8982862484ade13ccc4b, serialNumber=289064309a4417dcf339786241d3052e5ddbd6f07628be5505318b15872cbcdc, cn=Naikwade Ashok Shivaji
Date: 2018.04.26 16:51:49 +05'30'

(अशोक नाईकवाडे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षण), मुंबई/ नागपूर.

२. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
३. प्रधान सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव (व्यय) , वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव (पदुम) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग, वरळी, मुंबई-१८.
७. उप आयुक्त (प्रशासन), दुग्धव्यवसाय विकास विभाग, वरळी, मुंबई-१८.
८. प्रादेशिक दुग्ध व्यवसाय विकास अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई
९. दुग्धशाळा व्यवस्थापक, शासकीय दूध योजना, खोपोली, जि.रायगड
१०.जिल्हा कोषागार अधिकारी, रायगड, जि.रायगड.
११.उपकोषागार अधिकारी, खालापूर, जि.रायगड.
१२.वित्त विभाग, कार्यासन व्यय-२/ वित्तीय सुधारणा-१/ मंत्रालय, मुंबई-३२.
१३.कार्यासन अधिकारी, पदुम-१६, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४.निवड नस्ती.